**T.Y.B.A.**

**MARATHI**

**HISTORY OF MARATHI LITERATURE**

**(FORM BEGINNING TO 1818)**

**(PAPER-IV) (07TH MAY- 2018)**

**Q.P. Code : 26959**

[वेळ : ३ तास] [ गुण : १००]

Please check whether you have got the right question paper.

सूचना :
१. प्रश्न क्रमांक १ ते ८ पैकी कोणतेही चार प्रश्न सोडवा.
२. प्रश्न क्रमांक ९ आवश्यक आहे.
३. एकूण पाच प्रश्न सोडवा.
४. सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

**प्र.१.** महानुभाव साहित्याची स्वरूप वैशिष्ट्ये स्पष्ट करा. २०

**प्र.२.** संत नामदेव व त्यांच्या प्रभावळीतील संतांच्या वाङ्‌मयीन कार्याचा परिचय करून द्या. २०

**प्र.३.** पंडिती साहित्याची स्वरूप – वैशिष्ट्ये स्पष्ट करा. २०

**प्र.४.** शाहिरी वाङ्‌मयाच्या प्रेरणा सांगून पोवाडा आणि लावणी या प्रकारांचे साम्य-भेद स्पष्ट करा. २०

**प्र.५.** नाथ, दत्त, समर्थ व लिंगायत पंथियांनी लिहिलेल्या वाङ्‌मयातून त्यांचा पंथीय दृष्टिकोन कसा व्यक्त झाला आहे ते सांगा २०

**प्र.६.** प्राचीन मराठी साहित्यातील मुस्लिम व ख्रिश्चन धर्मियांच्या साहित्याचे स्वरूप स्पष्ट करा. २०

**प्र.७.** बखर वाङ्‌मयाचे स्वरूप व वैशिष्ट्ये सविस्तर स्पष्ट करा. २०

**प्र.८.** प्राचीन मराठी साहित्यातील विविध वाङ्‌मयप्रकारांचा परिचय करून द्या. २०

**प्र.९.** प्रत्येक गटातील दोन टिपा लिहा. **(एकूण चार)** २०

| **‘अ’ गट** | **‘ब’ गट** |
|---|---|
| १) विवेक सिंधू | १) जनाबाई |
| २) नामदेव गाथा | २) संत तुकाराम |
| ३) दासबोध | ३) वामन पंडित |
| ४) पानिपतची बखर | ४) परशराम |

*********************

**T.Y.B.A.**
**MARATHI**
**THEORY OF LITERATURE & LITERARY CRITICISM (REV)**
**(PAPER-V) (08TH MAY- 2018)**

Q.P.Code: 38951

(3 Hours) Marks 100

सूचना : १) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.

२) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

प्रश्न १. भरतमुनींचे रससूत्र सांगून त्यातील घटकांची चर्चा करा. १२

किंवा

टिपा लिहा :

अ) क्षेमेंद्राचा औचित्यविचार

आ) वामनाचा रीतिविचार

प्रश्न २. ॲरिस्टॉटलने मांडलेल्या अनुकृती सिद्धांताचे सविस्तर विवेचन करा. १२

किंवा

टिपा लिहा :

अ) कुन्तकाने सांगितलेले वक्रोक्तीचे सहा प्रकार

आ) रसविघ्ने

प्रश्न ३. भारतीय साहित्यशास्त्रातील शब्दशक्ती कोणत्या ते सांगून लक्षणेचे महत्व साधार विशद करा.१२

किंवा

अ) रूपक भाषिक कार्य

आ) मुक्तछंद

प्रश्न ४. प्रतिभा, व्युत्पत्ती व अभ्यास हे घटक साहित्य निर्मितीस कसे उपकारक आहेत ते सांगा. १२

किंवा

टिपा लिहा.

अ) साहित्यकृतीचा आस्वाद

आ) चमत्कृतीशक्ती

प्रश्न ५. मम्मटाने सांगितलेली काव्यप्रयोजने सोदाहरण विशद करा. १२

किंवा

टिपा लिहा.

अ) जीवनभाष्य : एक काव्यप्रयोजन

आ) धर्म अर्थ काम मोक्ष काव्यप्रयोजने

प्रश्न ६. रसास्वादासंदर्भातील भट्टलोल्लट व शंकुक यांच्या विचारांची चर्चा करा. १२

किंवा

Turn Over

टिपा लिहा.

अ) रिचर्डसचा प्रेरणासंतुलन सिद्धांत

आ) ॲरिस्टॉटलचा कॅथार्सिसचा सिद्धांत

७. साहित्यसमीक्षेतील समीक्षेची कार्ये सोदाहरण स्पष्ट करा. १२

किंवा

टिपा लिहा.

अ) साहित्यकृतीचे विश्लेषण

आ) साहित्यकृतीचे अर्थनिर्णयन

प्रश्न ८. पुढील प्रश्नांची पूर्ण वाक्यात उत्तरे लिहा. (कोणत्याही १६) १६

१) वामनाने सांगितलेले रीतिचे कोणतेही दोन प्रकार लिहा.

२) 'शिवेतरक्षतये' म्हणजे काय?

३) दंडीने सांगितलेली प्रतिभेची व्याख्या लिहा.

४) "काव्यशोभाकरान धर्मान अलंकारान प्रचक्षते" अशी अलंकाराची व्याख्या कोणी केली आहे?

५) "रीति: आत्मा काव्यस्य" हे सूत्र कोणी मांडले आहे?

६) प्रतिभेला 'वेडाची बहीण' असे कोणी म्हटले आहे?

७) कोलरिजने कोणती प्रतिभाशक्ती महत्वाची मानली आहे?

८) समीक्षा व्यापारातील पहिली पायरी कोणती?

९) आलंबनभाव म्हणजे काय?

१०) अभिधेचे कोणतेही दोन प्रकार सांगा.

११) राजशेखराने सांगितलेले प्रतिभेचे दोन प्रकार कोणते?

१२) 'गंगालहरी' या ग्रंथाचा कर्ता कोण?

१३) सर्जक अनुकृतीची संकल्पना कोणी मांडली?

१४) कोणतेही चार स्थायी भाव सांगा.

१५) अलंकरांना 'काव्यविभ्रम' असे कोणी म्हटले आहे?

१६) 'ध्वनी हाच काव्याचा आत्मा' असे कोणी म्हटले आहे?

१७) 'उपचित स्थायी म्हणजे रस' हे सूत्र कोणी मांडले?

१८) 'प्रतितीउपायवैकल्य' हे काय आहे?

१९) प्लेटोचा अनुकृतीविचार कोणत्या ग्रंथात लिहिला आहे?

२०) प्रतिभेचे अलौकिकत्व कशात आहे?

---

**T.Y.B.A.**

**MARATHI**

**LITERATURE AND SOCIETY (OLD)**

**(PAPER-VI) (11TH MAY- 2018)**

**Q.P. Code : 38944**

**(३ तास)** **(एकुण गुण: १००)**

**सूचना :** १. **सर्व** प्रश्न सोडविणे **आवश्यक** आहेत.
२. **सर्व** प्रश्नांना **समान** गुण आहेत. (**प्रत्येकी २५**)

प्र.१ अ) साहित्य, समाज आणि संस्कृती यांचा अन्योन्य संबंध स्पष्ट करा.

**किंवा**

आ) स्वातंत्र्योत्तर काळात निर्माण झालेल्या विविध वाङ्.मय प्रवाहामागे सामाजिक चळवळीची प्रेरणा आहे साधार विशद करा.

प्र.२ अ) औद्योगिकीकरणाचा ग्रामीण जीवनावर होणाऱ्या परिणामांची 'एस.ई.झेड' कादंबरीच्या अनुषंगाने चर्चा करा.

**किंवा**

आ) 'एस.ई.झेड' या कादंबरीतील संघर्षाचे स्वरूप साधार स्पष्ट करा.

प्र.३ अ) स्त्रीवादी साहित्याची संकल्पना स्पष्ट करून 'तिची कथा' या कथासंग्रहाचे वेगळेपण स्पष्ट करा.

**किंवा**

आ) 'तिची कथा' या कथासंग्रहाच्या आधारे स्त्री जीवनाच्या वेदनाचे चित्रण करा.

प्र.४ अ) 'निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी' या कादंबरीत महानगरीय संवेदना कशी प्रगट झाली आहे ते सोदाहरण स्पष्ट करा.

**किंवा**

आ) 'निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी या कादंबरीतील नायकाच्या जीवनाची शोकात्मिका स्पष्ट करा.

..............................................

**Q. P. Code : 38945**

**( सुधारीत अभ्यासक्रम )**

**( ३ तास )** **( एकूण गुण : १०० )**

**सूचना :** १) **सर्व** प्रश्नांना **समान गुण** आहेत.
२) दूर व मुक्त अध्ययन संस्थेच्या (IDOL) विद्यार्थ्यांसाठी वेळ ३ तास व एकूण गुण १०० (प्रत्येक प्रश्नास २५ गुण) आहेत.

१. साहित्य हे समाजांतर्गत घडणाऱ्या घटनांचे प्रतिबिंबीत रुप असते या विधानाचा परामर्श घ्या? २५

**किंवा**

साहित्य, समाज आणि संस्कृती यांच्या परस्पर संबंधाची चर्चा दि. के. बेडेकर आणि रा. ग. जाधव यांनी कशी केली आहे, हे साधार स्पष्ट करा?

२. 'गावठाण' मधील आनंदीच्या जीवनसंघर्षाचे स्वरुप उलगडून दाखवा? २५

**किंवा**

एक ग्रामीण कादंबरी म्हणून 'गावठाण' या कादंबरीचे वाङ्मयीन मूल्यमापन करा?

३. 'अवकाश' मधून जान्हवीचा आत्मशोध कसा आविष्कृत झाला आहे, हे सोदाहरण स्पष्ट करा? २५

**किंवा**

सानिया यांची 'अवकाश' ही कादंबरी तीच्या गुणवैशिष्ट्यासह कशी वेगळी ठरते, या विधानाचा परामर्श घ्या?

४. जानकीच्या आत्मपरिवर्तनाची कहाणी हे 'सूड' या कादंबरीचे बलस्थान आहे, याची सविस्तर चर्चा करा? २५

**किंवा**

बाबुराव बागुल यांनी 'सूड' या कादंबरीतून कोणता विचार मांडला आहे, साधार स्पष्ट करा?

---

**T.Y.B.A.**
**MARATHI**
**HISTORY OF MARATHI LITERATURE**
**(FORM BEGINNING TO 1818)**
**(PAPER-IV) (17TH MAY- 2018)**

Q. P. Code : 37998

वेळ – ३ तास एकूण गुण – १००

सूचना – १) प्रश्न क्र. १ ते ८ पैकी कोणतेही चार प्रश्न सोडवा.

२) प्रश्न क्र. ९ आवश्यक आहे.

३) एकूण पाच प्रश्न सोडवा.

४) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

१) महानुभावीय गद्य साहित्याची स्वरूप व वैशिष्ट्ये सोदाहरण स्पष्ट करा.

२) वारकरी साहित्याची मध्ययुगीन मराठी वाङ्मयात मोलाची भर आहे. – विधान स्पष्ट करा.

३) पंडिती वाङ्मयाच्या वैशिष्ट्यांचा सविस्तर आढावा घ्या.

४) शाहिरी वाङ्मय हे धीट कवींचे वाङ्मय आहे. – चर्चा करा.

५) प्राचीन मराठी वाङ्मयातील विविध पंथीय वाङ्मयाचा आढावा घ्या.

६) जैन, मुस्लिम आणि ख्रिश्चन साहित्यिकांनी प्राचीन मराठी वाङ्मय समृद्ध केले आहे सोदाहरण चर्चा करा.

७) मध्ययुगीन मराठी साहित्यातील साहित्यप्रकारांचा आढावा घ्या.

८) बखर वाङ्मयाचे स्वरूप व वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

९) प्रत्येक गटातील दोन टिपा लिहा. ( एकूण चार )

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १) लीळाचरित्र | १) मुकुंदराज |
| २) ज्ञानेश्वरी | २) तुकाराम |
| ३) मुक्तेश्वरांचे महाभारत | ३) मोरोपंत |
| ४) क्रिस्तपुराण | ४) शाहीर रामजोशी |

...............................

T.Y.B.A.
MARATHI
THEORY OF LITERATURE & LITERARY CRITICISM (REV)
(PAPER-V) (18TH MAY- 2018)

Q.P. Code :38949

(३ तास) (एकूण गुण: १००)

सूचना : १. उजवीकडील अंक प्रश्नांचे पूर्ण गुण दर्शवितात.
२. अंतर्गत पर्याय लक्षात घ्या.

१. अ) भरतमुनीचे रसविषयक सूत्र सविस्तर स्पष्ट करा. १२

किंवा

आ) टिपा लिहा.
१) वक्रोक्तीचे प्रकार
२) क्षेमेन्द्राचा औचित्यविचार

२. अ) वामनाचा रीतिविचार सविस्तर स्पष्ट करा. १२

किंवा

आ) टिपा लिहा.
१) अलंकार ध्वनी
२) कुंतल

३. अ) लक्षणाशक्ती म्हणजे काय? लक्षणेचे प्रकार सविस्तरपणे लिहा. १२

किंवा

आ) टिपा लिहा.
१) साहित्याची भाषा-रुपक
२) काव्यातील छंद

४. अ) प्रतिभा म्हणजे काय? साहित्यानिर्मितीत प्रतिभे बरोबरच अभ्यास आणि व्युत्पत्ती या घटकांचे महत्त्व विशद करा. १२

किंवा

आ) टिपा लिहा.
१) कल्पनाशक्तीचे प्रकार
२) प्रतिभेचे अलौकिकत्व

५. अ) प्राचीन संस्कृत साहित्यशास्त्रातील काव्यप्रयोजनांचा परामर्श घ्या. १२

किंवा

आ) टिपा लिहा.
१) आत्माविष्कार एक काव्यप्रयोजन
२) सामाजिक बांधिलकी

६. अ) अभिनवगुप्ताच्या रसनिष्पात्तिविषयक उपपत्तिचा सविस्तर परिचय करुन द्या. १२

**किंवा**

आ) टिपा लिहा.

१) रिचर्डस्‌चा 'प्रेरणासंतुनाचा' सिध्दान्त

२) संभावनाविरहः एक रसविहन

७. अ) समीक्षा म्हणजे काय? समीक्षेतील विश्लेषण व मूल्यमापन या घटकांचे महत्त्व विशद करा. १२

**किंवा**

आ) टिपा लिहा.

१) साहित्य समीक्षेचे कार्य

२) अर्थनिर्णयन

८. पुढील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. **(कोणतेही १६)** १६

१) शब्द आणि अर्थ यांचे साहितत्व म्हणजे काव्य असे कोणी म्हटले आहे?

२) आनंदवर्धनाने कोणता सिध्दान्त मांडला आहे?

३) क्षेमेंद्राने कोणता विचार सांगितला आहे?

४) अभिनवगुप्ताच्या मते प्रतिभेचे सामर्थ्य कशात आहे?

५) 'प्रतिभा ही वेडाची बहीण आहे' असे कोणी म्हटले?

६) 'उत्स्फूर्त भावनांचा तीव्र आविष्कार म्हणजे काव्य' ही काव्य व्याख्या कोणाची?

७) वाच्यार्थ म्हणजे काय?

८) चित्त वृत्ती म्हणजे काय?

९) गौणी लक्षणेचे दोन प्रकार कोणते?

१०) अनुभाव म्हणजे काय?

११) उत्प्रेक्षा म्हणजे काय?

१२) रिचर्डस्‌ने कोणाची जीवनविषयक विचारधारा कलाव्याधाराला लावून दाखविली आहे?

१३) 'सरस्वती कंठाभरण' हा ग्रंथ कोणी लिहीला.

१४) 'पोएटिक्स' ह्या ग्रंथाचा कर्ता कोण आहे?

१५) सर्वसाधारण वाचकांचा समीक्षक हा कोण असतो?

१६) मम्मटांनी सांगितलेली कोणतीही तीन प्रयोजने लिहा.

१७) विश्वनाथाने केलेली काव्याची व्याख्या सांगा.

१८) अर्थनिर्णयन म्हणजे काय?

१९) असाला 'स्थायी विलक्षण' कोणी म्हटले?

२०) अतिशयोक्ति म्हणजे काय?

---

**T.Y.B.A.**
**MARATHI**
**LITERATURE AND SOCIETY (OLD)**
**(PAPER-VI) (21TH MAY- 2018)**

**Q.P. Code :08992**

[वेळ : ३ तास ] [गुण :१०० ]

सूचना : १) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.
२) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

प्र.१ अ) 'साहित्य सौंदर्यात्मक, कलात्मक संस्कार करीत असताना नैतिक, ज्ञानात्मक, मूल्यात्मक संस्कारही करते'- या विधानाची सविस्तर चर्चा करा. २५

किंवा

ब) साहित्य-समाज-आणि संस्कृती' यांचा परस्पर अनुबंध स्पष्ट करा.

प्र.२ अ) 'पुरुषप्रधान संस्कृतीने रूढी परंपरेच्या नावाखाली स्त्रिला नेहमीच दुय्यम स्थान दिले' या विधानाची सार्थकता 'तिची कथा' च्या आधारे स्पष्ट करा. २५

किंवा

ब) 'समाजामध्ये शिक्षण, आर्थिक स्वावलंबन, व्यक्तिमत्व विकास, निर्णय स्वातंत्र्य हे प्राप्त होऊनही स्त्रीचे प्रश्न संपलेले नाहीत' - या विधानाची आधारे चर्चा करा.

प्र.३ अ) औद्योगिकरणाचा ग्रामीण संस्कृतीवर, ग्रामजीवनावर होणाऱ्या परिणामांची 'एसईझेड' कादंबरीच्या अनुषंगाने चर्चा करा. २५

किंवा

ब) 'एसईझेड' कादंबरीचे वाङ्मयीन वेगवेगळेपण सविस्तर मांडा.

प्र.४ अ) 'आधुनिक यंत्रयुगातील मध्यमवर्गीय सुशिक्षित मनाची वैफल्यग्रस्त अवस्था 'निष्पर्ण वृक्षावर ...... भर दुपारी' या कादंबरीतून कशी मांडली आहे'- चर्चा करा. २५

किंवा

ब) 'निष्पर्ण वृक्षावर ..... भर दुपारी' कादंबरीचा संघर्ष सविस्तरपणे उलगडून दाखवा.

-------------------------

**T.Y.B.A.**

**MARATHI**

**LITERATURE AND SOCIETY (REV)**

**(PAPER-VI) (21TH MAY- 2018)**

**QP Code : 08633**

(3 Hours) **[ Total Marks : 100**

**सूचना :** (१) **सर्व** प्रश्नांना **समान** गुण आहेत. **(प्रत्येकी २० गुण)**
(२) **दूर व मुक्त अध्ययन संस्थेच्या विद्यार्थ्यांसाठी (IDOL)** विद्यार्थ्यांसाठी वेळ ३ तास व एकूण गुण - १०० (**प्रत्येक** प्रश्नास २५ गुण आहेत)

१. (अ) ''साहित्य आणि समाज यांचे संबंध नेहमी सुसंवादी असतातच असे नाही'' या विधानाचा परामर्श घ्या. २०

**किंवा**

(ब) मार्क्स आणि तेन यांची साहित्याच्या सामजिकतेविषयीची भूमिका उलगडून दाखवा.

२. (अ) ग्रामीण साहित्य म्हणजे काय ते सांगून ग्रामीण साहित्याचे स्वरूप स्पष्ट करा. २०

**किंवा**

(ब) कृषी संस्कृतीशी एकरूप झालेल्या ग्रामीण स्त्रींचे चित्रण 'गावठाण' कादंबरीमधून कसे आलेले आहे ते सविस्तर लिहा.

३. (अ) स्त्रीवादी साहित्यप्रवाहाची तात्त्विक मांडणी करा. २०

**किंवा**

(ब) जान्हवीची घुसमट का आणि कशी होते याची सानिया यांच्या 'अवकाश' कादंबरीसंदर्भात चिकित्सा करा.

४. (अ) मराठी साहित्यातील दलित साहित्यप्रवाहाच्या स्वरूप-वैशिष्ट्यांचा परामर्श घ्या. २०

**किंवा**

(ब) बाबूराव बागूल यांच्या 'सूड' कादंबरीच्या आधारे जानकीच्या व्यक्तिरेखेची चिकित्सा करा.

---

**T.Y.B.A.**
**MARATHI**
**INTRODUCTION TO LINGUISTICS & OUTLINE OF MARATHI GRAMMAR**
**(PAPER-VII) (MAY- 2018)**

**Q.P. Code :40345**

[वेळ : तीन तास] [ गुण : १००]

Please check whether you have got the right question paper.

सूचना: १. सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.
२. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.

प्र.१ अ. मानवी भाषा आणि मानवेतरांच्या भाषेपेक्षा कोणत्या बाबतीत वेगळी ठरते हे सांगून मानवी भाषेची कार्ये विशद करा. २०

**किंवा**

ब. ऐतिहासिक भाषा विज्ञानाची संकल्पना स्पष्ट करून ऐतिहासिक भाषाविज्ञान पद्धतीच्या मर्यादा स्पष्ट करा.

प्र.२ अ. स्वन परिवर्तन म्हणजे काय? स्वन परिवर्तनाची कारणे सांगा. २०

**किंवा**

ब. अर्थपरिवर्तनाचे स्वरूप स्पष्ट करून अर्थ परिवर्तनाचे प्रकार लिहा.

प्र.३ अ. विविध व्याकरणकारांनी सांगितलेली शब्द जातींची वर्गीकरणे सांगून 'क्रियापद' या शब्द जातीची सविस्तर मांडणी करा. २०

**किंवा**

ब. प्रयोग म्हणजे काय? कर्तरी आणि भावे प्रयोग यांचा आढावा घ्या.

प्र.४ अ. विभक्ती म्हणजे काय? विभक्तीचे विविध प्रकार स्पष्ट करा. २०

**किंवा**

ब. शब्द सिद्धी म्हणजे काय? शब्द सिद्धीचे विविध प्रकार सांगून समासिक शब्दांची मांडणी सोदाहरण करा.

प्र.५ अ. खालीलपैकी कोणत्याही दोहोंवर टिपा लिहा. १०
१. हॉकेटने सांगितलेली भाषा आदानाचे प्रकार
२. अर्थ संकोच
३. स्वप्नांची लक्षणे
४. भाषा एक चिन्ह व्यवस्था

ब. खालीलपैकी कोणत्याही दोहोंवर टिपा लिहा. १०
१. क्रिया विशेषण
२. कर्तरी प्रयोग
३. सर्वनाम
४. उपसर्गघटित शब्द

***********

**T.Y.B.A.**
**MARATHI**
**THE STUDY OF AN AUTHOR (REV)**
**(PAPER-VIII) (MAY- 2018)**

**Q.P. Code: 40350**

[वेळ: ३ तास] [गुण: १००]

**सूचना:** १. सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.
२. विवक्षित पुस्तकांच्या संदर्भातील प्रश्नांची उत्तरे लिहताना लेखकाच्या इतर पुस्तकांची योग्य ती उदाहरणे देणे आवश्यक आहे.

**प्र.१** विशिष्ट लेखकाचा अभ्यास करताना कोणकोणत्या गोष्टीचे अवधान राखावे लागते ते तपशील देऊन स्पष्ट करा. २०

**किंवा**

विशिष्ट लेखकाभ्यासामागील प्रयोजने स्पष्ट करून लेखकाभ्यासामागील अडचणीचा आढावा घ्या.

**प्र.२** "मानवी लैंगिक व्यवहाराच्या निकोप दृष्टीकोनाअभावी होणारा माणसाचा मानसिक व शारीरिक कोंडमारा जयवंत दळवींच्या कथांमधून डोकावत राहतो" या विधानाचा 'वेचक जयवंत दळवी' कथासंग्रहाधारे परामर्श घ्या. २०

**किंवा**

"जयवंत दळवींची कथा सतत मानवी जीवनातील दु:खाचा शोध घेत असते" या विधानाची 'वेचक जयवंत दळवी' या कथासंग्रहाधारे सत्यता स्पष्ट करा.

**प्र.३** तत्कालीन सामाजवास्तवाचे व्यक्तीच्या मनावर होणारे परिणाम 'अंधाराच्या पारंब्या' मध्ये कसे व्यक्त झाले आहेत ते स्पष्ट करा. २०

**किंवा**

'अंधाराच्या पारंब्या' या कादंबरीच्या शीर्षकाची यथार्थता सोदाहरण स्पष्ट करा.

**प्र.४** "तऱ्हेवाईक माणसांच्या व्यक्तिचित्रणाचा एक प्रदीर्घ पटच म्हणजे 'सारे प्रवासी घडीचे' ही साहित्यकृती होय" हे विधान सोदाहरण स्पष्ट करा. २०

**किंवा**

"हसवता हसवता अंतमुर्ख करणारी साहित्यकृती म्हणजे 'सारे प्रवासी घडीचे' हे पुस्तक होय" या विधानाची सोदाहरण चर्चा करा.

**प्र.५** वृद्ध मातापित्यांच्या अपेक्षाभंगाचा नाट्यात्मक अविष्कार 'संध्याछाया' या नाटकामध्ये कसा व्यक्त झाला आहे ते सोदाहरण स्पष्ट करा. २०

किंवा

"उच्चविद्याविभूषित परदेशस्थित तरुण व त्यांचे मातृभूमीमध्ये राहणारे वृद्ध मातापिता यांच्यातील आंतरिक संघर्ष 'संध्याछाया' हे नाटक पाहताना रसिकांना शोकमग्न करते" या विधानाचा परामर्श घ्या.

****************

**T.Y.B.A.**
**MARATHI**
**TRANSLATION LITERARY ESSAY & PROJECT**
**(PAPER-IX) (MAY- 2018)**

**Q. P. Code : 40352**

**(३ तास)** **(एकूण गुण:८०)**

**Please check whether you have the right question paper.**

**सूचना:** १) दूरस्थ शिक्षण संस्थेच्या (IDE) विद्यार्थ्यांसाठी वेळ ३ तास व एकूण गुण १०० आहेत.

**प्र.१** अ) भाषांतर म्हणजे काय ते सांगून आज भाषांतर कोणकोणत्या क्षेत्रात उपयुक्त ठरते, ते सविस्तर स्पष्ट करा. १५

किंवा

आ) भाषांतर, रुपांतर, अनुवाद व अर्वाचीनीकरण यांतील साम्यभेदांची चर्चा करा.

प्र.२ अ) ललित साहित्यकृतींच्या भाषांतर प्रक्रियेत सांस्कृतिक संदर्भांचे भान कितपत आवश्यक ठरते, ते सोदाहरण स्पष्ट करा. १५

किंवा

आ) ललित साहित्याचे भाषांतर करताना शैली ह घटक आव्हान ठरतो, कसे ते सविस्तर लिहा.

प्र.३ पुढीलपैकी इंग्रजीतील <u>एक</u> हिदीतील <u>एक</u> मध्ययुगीन मराठी गद्यांपैकी <u>एक</u> अशा एकूण तीन उताऱ्यांचे मराठीत भाषांतर करा. ३०

अ) As we all know that our environment is very necessary for our healthy existence on the earth. A healthy environment depends on the good habits of human beings and the circumstances we create. Human, animal, plants, earth and environment are indirectly connected to each other and necessary for the existence of healthy life here. However, by any means if our environment gets affected negatively, creates lots of problems and many challenges in living a simple and healthy life. Our environment acts as a natural world for us and provides a protection to us from the natural calamities. However, it becomes helpless in protecting us if we disturbs its natural cycle and force it to harm us.

ब) Teachers are great sources of knowledge, prosperity and enlightenment to which anyone can be benefited for whole life. They serve as the real light in everyone’s life as they help students to make their ways in the life. They are the God gifted people in everyone’s life who lead us towards success without any selfishness. Really, we can call them as builders of the dazzling future of our nation through education. Teacher plays very essential role in the field of education who teaches students very nicely to

be a person of good moral and behavior. They make students academically superb and always encourage to do better in the life.

क) नियमित आधार पर किसी भी चीज का अभ्यास करना, एक व्यक्ति की बौध्दिकता और सौंदर्य क्षमताओं को इंगित करता है | अभ्यास एक व्यक्ति को पूर्ण करता है, क्योंकि यह पूर्णता लाता है, जो एक व्यक्ति को विशेष विषय या क्षेत्र ने उत्कृष्ठता प्राप्त करने की ओर ले जाता है| कार्यों को उचित योजना और अभ्यास के अनुसार करना एक व्यक्ति का पुर्न प्रदर्शन की और नेतृत्व करता है | अभ्यास किसी भी कार्य को करने में गुणवत्ता लाने के साथ ही एक व्यक्ति के अन्य गुणों के लिए भी तैयार करता है | अभ्यास कमियों को नजरंदाज करके कार्य को पूर्णता के साथ पूरा करने में मदद करता है | अभ्यास बहुत ही महत्वपूर्ण वास्तु है, जिसे हमें अपने जीवन में अवश्य अपनाना चाहिए | यदि इसे अभिभावकों और शिक्षकों की मदद से बचपन में ही विकसित किया जाए , तो यह और भी अच्छा होता है |

ड) शिक्षा सभी के जीवन में,व्यक्तित्व का निर्माण, ज्ञान और कौशल में सुधार करके, एक सभ्य बनाने में महान भूमिका निभाती है| यह एक व्यक्ति को भले और बुरे के बारे में सोचने की क्षमता प्रदान करती है | हमारे देश में शिक्षा को तिन श्रेणियों में विभाजित किया जाता है ; प्रारम्भिक शिक्षा, माध्यमिक शिक्षा, और उच्च माध्यमिक शिक्षा | यह चीजों और परिस्थितियों का विश्लेषण करने के लिए हमारे कौशल, चरित्र और पुरे व्यक्तित्व को विकसित करती है | शिक्षा एक व्यक्ति के जीवन में लक्ष्य को निश्चित करने के द्वारा उसके वर्तमान और भविष्य को पोषित कराती है | शिक्षा के महत्त्व और इसकी गुणवत्ता में दिन प्रति दिन सुधार व वृद्धि हो रही है |

इ) एकी गावी म्हातारी एकीचा पुत गोरुवें राखे : तेणेंसी गोसवियासि पाडु प्रज्ञान अति: तीए गावीं गोसवियासि वृक्ष खालि आसन : ऐसा तेयासि जरू आला : तयाचीया माता म्हणीतलें : 'जी जी : तेयासि जरू आला : आतां गोरुवें आणिकासि निरोवीति : आम्ही मेलों' : गोसावी तेयाचीया घर बीजें केलें : तेयाचें पांगरुनि तेया सरिसा पहुड स्वीकरिला : तेयासि समाधान जालें : तो गोरुवासरिसा पाठवीला : तेयाची माए गोसावियासि पथ्य करी : केतुलेया एक दीसा : गोसावी समाधान स्विकरिलें : मग त्यें गोसावीया नीगों नेदीती : सर्वज्ञें म्हणीतलें : 'हें तयासि भांडौनि निगालें' : हे गोष्टि भुतानंदाप्रति सांघितली ||

ई) गोसावी गावां एक बीजें करीत असति : तेथीचेनि लोकें वारिलें : 'देव व्हो : या वाटा न वचा : न वचा : एथ अरणम्हैसा असे : तो माणुसें मारी' : आइकोनी बीजें केलें : ते मार्गी चालतां वाणी पडली अणि म्हैसा आला : गोसावी अवलोकीला : आणि तेयाचा रोखु निवर्तला: बीजें केलें : तीये दिउनि तो मार्गु वसता जाला ||

प्र.४ पुढीलपैकी कोणत्याही एक विषयावर निबंध लिहा. (दूरस्थ शिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्यानी पुढीलपैकी कोणतेही दोन निबंध लिहावेत.(गुण ४०) २०

अ) मराठी भाषा : काल आणि व्याज

ब) चळवळ अणि स्त्रीवादी साहित्य

क) साहित्यसंमेलानाची गरज संपली आहे काय?

ड) कलावंताचे अभिव्यक्तीस्वतांत्र्य

इ) जागतिकीकरण आणि मराठी साहित्य